**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 23.05.2025** **वार- शुक्रवार**

---

**बैठक**

मोसमी पावसाचा अंदाज पाहता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेबरोबरच सर्वच संबंधित विभागांनी समन्वय ठेऊन आपत्तीवर मात करण्यासाठी काम करावं, आपत्तीबाधित नागरिकांना दिलासा देण्यासाठी सर्व सुविधा पुरविण्याचं नियोजन करावं असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले आहेत. पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेत आयोजित मान्सूनपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आयुक्त शेखर सिंह, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पिंपरी चिंचवडमध्ये ज्या ठिकाणी पावसाचं पाणी मोठ्या प्रमाणावर साचतं, अशी ठिकाणं तात्काळ शोधून काढून तिथे कायमस्वरुपी उपाययोजना करा. शहरातील धोकादायक इमारतींना नोटीस देण्यासोबतच तेथील नागरिकांना आपत्कालीन परिस्थिती सुरक्षितस्थळी हलवण्याचे नियोजन करा असे निर्देश आयुक्त सिंह यांनी यावेळी दिले.

**बियाणांचे नियोजन**
पुणे जिल्ह्यात यंदा खरिपाचं क्षेत्र वाढण्याची अपेक्षा असून त्यादृष्टीने जिल्हा कृषी विभागाने बियाणांचे नियोजन केले आहे. यंदाच्या खरीप हंगामात 42 हजार क्विंटल बियाणांची आवश्यकता आहे, त्या दृष्टीने 48 हजार 302 हजार क्विंटल बियाणे उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी विभाग अधिकारी संजय कांचोळे यांनी दिली आहे. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक 61 हजार हेक्टरवर भाताचे उत्पादन घेतले जाते, त्या खालोखाल सोयाबीनचे 51 हजार हेक्टर तर बाजरी 40 हजार हेक्टरवर घेतली जाते.

**Pcmc**
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये आकाशचिन्ह आणि परवाना विभागानं जाहिरात फलकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मान्सुनपूर्व काळात अनेक उपाययोजना केल्या आहेत. गेल्या दोन दिवसांमधील मान्सूनपूर्व पावसाचा अनुभव विचारात घेता सर्व जाहिरात फलक उतरवण्यास कालपासून सुरूवात केली आहे, अशी माहिती पालिका उपायुक्त राजेश आगळे यांनी दिली.

**वैष्णवी आत्महत्या प्रकरण**
पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई केली जाईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज कोल्हापूर जिल्ह्यात वार्ताहरांशी बोलताना दिली. दरम्यान या प्रकरणात सात दिवसांपासून फरार असलेले वैष्णवीचे सासरे राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे यांना आज पहाटे स्वारगेट इथून पोलिसांनी अटक केली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माजी पदाधिकारी राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवी

हगवणे हिने 16 मे रोजी सासरच्या छळाला कंटाळून पुण्यातील राहत्या घरात आत्महत्या केली. या प्रकरणी वैष्णवीचे पती शशांक, सासू लता आणि नणंद करिष्मा यांना पोलिसांनी यापूर्वीच अटक केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत राजेंद्र हगवणे यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे.

**पंचवार्षिक खर्च**

पुणे शहरातील पाचगाव-पर्वती, भांबुर्डे आणि वारजे इथल्या टेकड्यांच्या संरक्षणासाठी 2022 ते 2027 या कालावधीसाठी पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने 26 कोटी 25 लाख रुपयांचा पंचवार्षिक खर्च मंजूर केला असला, तरी आजवर या निधीचा वापर झालेला नाही. त्यामुळे टेकड्यांवरील सुरक्षा आणि पर्यावरणीय संवर्धनाच्या उपाययोजना रखडल्या असून, हा निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा अशी मागणी आमदार हेमंत रासने यांनी महापालिका आयुक्तांना पत्र लिहून केली आहे.

**सिरम पाणी**

सिरम इन्स्टिट्यूटनं पुणे महापालिकेकडे रोज 15 लाख लिटर प्रक्रिया न केलेलं पाणी पुरविण्याची मागणी केली आहे. त्यानुसार हे पाणी पुरवून महापालिका सिरमकडून प्रतिलिटर 27 रुपये 47 पैसे इतका दर आकारणार आहे. त्या दरामध्ये प्रतिवर्षी 10 टक्के वाढ करण्यास स्थायी समितीने मान्यता दिली आहे. पुणे महापालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी ठेवला होता.

**उच्च सुरक्षा क्रमांक पाटी**

जुन्या वाहनांना ‘उच्च सुरक्षा क्रमांक पाटी’ म्हणजे एचएसआरपी बसविण्यासाठी पुणे शहरातील वाहनधारकांकडून कमी प्रतिसाद मिळाल्याचे समोर आले आहे. शहरातील 25 लाख वाहनांपैकी कालअखेर केवळ साडेचार लाख वाहनांचीच ऑनलाइन नोंदणी करण्यात आली, तर दोन लाख 8 हजार वाहनांना ही पाटी बसविण्यात आली आहे. उर्वरित वाहनधारकांनी 30 जूनच्या आत उच्च सुरक्षा क्रमांकाची पाटी बसवून घ्यावी. अन्यथा संबंधित वाहनधारकांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल, असा इशारा पुणे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयानं दिला आहे.

**विश्वबंधुता भूषण पुरस्कार'**

विश्वबंधुता साहित्य परिषदेच्या वतीने दिला जाणारा 'विश्वबंधुता भूषण पुरस्कार' यंदा जेष्ठ कामगार नेते कॉम्रेड अजित अभ्यंकर आणि रयत शिक्षण संस्थेच्या कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांना जाहीर झाला आहे. येत्या 2 जून रोजी पुण्यात या पुरस्काराचं वितरण होईल, अशी माहिती परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी दिली.

**भांगेची शेती**

भांगेची शेती करणाऱ्या दोघांना पोलिसांनी आळंदी आणि म्हाळुंगे इथून अटक केली आहे. आळंदी येथून दोन लाख तर म्हाळुंगे इथून 14 लाख रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ हवामान आहे. आज कमाल तापमान 28 तर किमान तापमान 22 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही दिवसभर ढगाळ हवामान असेल आणि दुपारनंतर हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**